
महात्मा फुले कृषि विद्यापीठ

अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## जुलै २०२२

## ई वार्ता




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४८१/२०२२

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२२

## मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते कृषि विज्ञान संकुलाचे भूमिपूजन






**दि. ३० जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मान्यता मिळालेल्या नाशिक जिल्ह्यातील मौजे काष्टी, ता. मालेगाव येथे सुरु असलेल्या कृषि विज्ञान संकुलाच्या भव्य इमारतीचा भूमिपूजन समारंभ मा.ना. श्री. एकनाथजी शिंदे, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी कृषि व माजी सैनिक कल्याण मंत्री व कृषि विज्ञान संकुलाचे प्रणेते मा. आ. श्री. दादाजी भुसे उपस्थित होते. याप्रसंगी मालेगाव शहराचे मा. आमदार श्री. मुफ्ती मोहम्मद इस्माईल खलिक तसेच विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, नंदुरबार डॉ. सातप्पा खरबडे आणि सहयोगी अधिष्ठाता, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, काष्टी डॉ. विश्वनाथ शिंदे हे उपस्थित होते.

या भव्य कार्यक्रमाप्रसंगी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे व मा.आ.श्री. दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते कोनशिलेचे अनावरण करण्यात आले व इमारत बांधकामासाठी कुदळ टाकून कामाचे पूजन करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विज्ञान संकुलाच्या विकासाचे काम येथे सुरू आहे.

मा. मुख्यमंत्री यांनी भूमिपूजन समारंभ प्रसंगी उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना हे कृषि विज्ञान संकुल एक वरदान ठरेल तसेच शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या मुलांचा जास्तीत जास्त विकास होण्यास मदत होईल अशी आशा व्यक्त केली. संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी कृषि विज्ञान संकुलाचे महत्व व उद्दिष्ट्ये मान्यवरांना विषद केली. कृषि विज्ञान संकुलांतर्गत पाच कृषि संलग्न महाविद्यालयांना परवानगी मिळाली होती व त्यासाठी मौजे काष्टी, ता. मालेगाव येथे ६२२ एकर जमीन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीकडे हस्तांतरित करण्यात आली आहे व त्यापैकी पहिले कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय सन २०२०–२१ मध्ये सुरू झालेले आहे. या महाविद्यालयासाठी ४० विद्यार्थ्यांची मान्यता असून शैक्षणिक वर्ष सन २०२१–२२ मध्ये प्रत्येकी ४० विद्यार्थी संख्या असलेल्या अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय व महाराष्ट्रातील पहिले कृषि तंत्र निकेतन (इंग्रजी माध्यम ३ वर्ष) या अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली व हे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. तसेच शैक्षणिक वर्ष सन २०२२–२३ साठी शासनाने कृषि महाविद्यालय, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय आणि उद्यानविद्या महाविद्यालय यातील महाविद्यालयांना अनुक्रमे ६०, ६० आणि ४० अशा विद्यार्थी संख्यानुसार सुरु करण्यास परवानगी दिली आहे. भूमिपूजनाची सांगता झाल्यानंतर कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे यांनी आभार प्रदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नाना देवरे, उपविभागीय कृषि अधिकारी, मालेगाव व डॉ. संजय पाटील, विद्यार्थी कल्याण अधिकारी, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, काष्टी यांनी केले. कार्यक्रमाला कृषि विज्ञान संकुल येथील सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते तसेच पंचक्रोशीतील शेतकरी बांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात साजरा





**दि. ४ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे मध्यवर्ती परिसरातील विविध प्रकल्पांमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत  रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे, राहुरीचे तहसीलदार श्री. फसिउद्दीन शेख, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे, विभागीय वन अधिकारी श्री. वाय.जे. पाचारणे, कुलगुरुंचे विशेष कार्याधिकारी  डॉ. महानंद माने, कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल व प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी वृक्षलागवडीचे महत्व सांगतांना माहिती दिली की राहुरी कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात १ लाख वृक्ष लागवडीचे नियोजन असून मध्यवर्ती परिसरातील विविध प्रकल्पांच्या प्रक्षेत्रावर २० हजार आंबा, जांभूळ, पेरु, बांबु इ. झाडांची लागवड करण्यात येणार आहे. विद्यापीठात आजपर्यंत ३ लाख ९३ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्यापैकी ८० टक्के वृक्ष आज चांगल्या अवस्थेत आहेत. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी वृक्षारोपण कार्यक्रमाविषयी माहिती देतांना सांगितले की महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या प्रयत्नांने महाराष्ट्र हरितक्रांतीबरोबरच अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण झाला. कै. वसंतराव नाईक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महाराष्ट्रात १ जुलै हा दिवस कृषि दिन म्हणुन साजरा केला जातो. याचबरोबर १ ते ७ जुलै या दरम्यान कृषि सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. आदर्श गाव योजनेतंर्गत पाणलोट क्षेत्र, राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प-वनशेती, मध्यवर्ती रोपवाटीका/बियाणे विभागांतर्गत ड विभाग, उद्यानविद्या रोपवाटीका विभाग व अखिल भारतीय समन्वीत वनशेती प्रकल्प, डिग्रस टेकडी या प्रक्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली. या ठिकाणी झालेल्या वृक्ष लागवडीचे नियोजन डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. आनंद सोळंके, डॉ. सचिन नांदगुडे, डॉ. भिमराज नजन व डॉ. बाबासाहेब सिनारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वनमहोत्सव कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन डॉ. के.डी. चव्हाण आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. गोकुळ वामन यांनी केले. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

## श्री. बाबासाहेब गोरे व श्री. प्रविण सोरटे हे आहेत जुलै महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नविन संकल्पना राबविली आहे. यामध्ये दर महिन्याला एक प्रगतशील शेतकरी व एक कृषि पदविचा कृषि उद्योजक यांच्या कार्याविषयी माहिती असलेला फलक विद्यापीठ प्रवेशद्वार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनी भागात तसेच विद्यार्थी वसतीगृहाचा दर्शनी भागात या

वर्ष :२, अंक क्रं. : १९, जुलै, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

ठिकाणी लावण्यात येतो तसेच विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रे येथील प्रवेशद्वाराजवळ लावण्यात येतो जेणेकरुन संबंधीत प्रगतशील शेतकरी व कृषि उद्योजक यांच्या कार्याचा परिचय विद्यापीठाला आणि कृषि महाविद्यालयांना, कृषि संशोधन केंद्रांना व कृषि विज्ञान केंद्राना भेट देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी, अधिकारी व विद्यार्थ्यांना होतो. तसेच या व्यक्तिंचा आदर्श घेऊन तरुण शेतकरी व पदवीधरांना प्रेरणा मिळते.

जुलै २०२२ या महिन्याकरीता शेतकरी आयडॉल म्हणुन मु.पो. राजुरी, ता. राहाता, जि. अहमदनगर येथील श्री. बाबासाहेब गोरे व कृषि उद्योजक म्हणुन कोल्हापूर कृषि महाविद्यालयातून बी.एस्सी (कृषि) चे शिक्षण घेतलेले बारामती तालुक्यातील श्री. प्रविण सोरटे यांचा समावेश आहे. श्री. बाबासाहेब गोरे यांनी डाळिंब पिकाची रुंद गादी वाफा लागवड पध्दत, एक खोड पध्दत, टॉपिंग आणि वाटरशूट काढण्याचे तंत्रज्ञान, डाळिंबासाठी संजिवनी ऑरगॅनिक कल्चर, अव्हेना न्युट्रीमिक्स (१० रुपयात १ लिटर मायक्रोन्युट्रीयन्ट मिक्चर बनविण्याची पध्दत), कॉटन केक स्लरी (सरकी पेंड स्लरी) हे तंत्रज्ञान विकसीत केले. सोयाबीन (फुले संगम) या वाणाचे प्रति एकर २५ क्विंटल उत्पादन तंत्रज्ञान विकसीत केले. याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचे सोशल मिडीयाद्वारे प्रसार करतात व त्यांनी आत्तापर्यंत १ लाखापेक्षा जास्त शेतकरी व अधिकारी यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले आहे. कृषि उद्योजक असलेले श्री. प्रविण सोरटे यांनी एकुण १२५ एकर क्षेत्रावर यांत्रिकीकरण व काटेकोर शेती तंत्रज्ञानाचे अवलंबन केले. एच.एफ. जातींच्या ३५० गाई व कालवडींचे अत्याधुनिक, यांत्रिक व नियोजनबध्द पध्दतीने संगोपन केले. त्यांच्या नवनाथ मिल्कद्वारे ५ हजार शेतकरी सभासदांकडून प्रतिदिन ४० ते ४५ हजार लिटर दुध संकलन केले जाते. त्यांच्या महिंद्रा फार्म या डिव्हीजनद्वारे विविध अवजारे व ट्रॅक्टर्सची विक्री केली जाते. त्यांनी भारतातील महिंद्रा कंपनीचे पहिले कृषि ई सेंटर सुरु केले आहे. श्री. सोरटे यांनी विविध उद्योगांद्वारे ४०० पेक्षा जास्त कामगारांना रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे.

## सामंजस्य करार

### राहुरी कृषि विद्यापीठाचा आयआयटी, कानपूर सोबत सामंजस्य करार



**दि. १ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि गंगानदी खोरे व्यवस्थापन अभ्यास केंद्र, आयआयटी कानपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेतीसाठी मार्गदर्शक तत्वे आणि धोरणे या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन नवी

दिल्ली येथे दिनांक ३० जून ते १ जुलै, २०२२ करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्र सरकारचे जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानाचे महासंचालक डॉ. अशोक शर्मा हे होते. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी उपमहासंचालक आणि विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, आयआयटी कानपूर येथील ई गंगा केंद्राचे संस्थापक डॉ. विनोद तारे, आंतर विद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. महानंद माने, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकीचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनिल कदम, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आणि आयआयटी कानपूर येथील शास्त्रज्ञ ऑनलाईन माध्यमाव्दारे उपस्थित होते.

यावेळी डॉ. शर्मा मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतीकडे व्यावसायिक दृष्टीकोन म्हणून पाहिल्यास समाजातील आर्थिक आणि सामाजिक समस्या दूर होण्यास मदत होईल म्हणून शेतीमध्ये विविधीकरण घडवून आणणे गरजेचे आहे. याप्रसंगी डॉ. कोकाटे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. रसाळ यांनी विद्यापीठाच्या संशोधन, शिक्षण आणि विस्तार या विषयाचा आढावा दिला. डॉ. गोरंटीवार यांनी हवामान अद्ययावत शेतीच्या घटकांबद्दल तसेच कृषि पध्दती, पारंपारिक, सेंद्रिय, नैसर्गिक आणि अचुक शेती तसेच विविध सरकारी कृषि धोरणे याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. तारे यांनी मान्यवरांचे स्वागत, परिचय आणि कार्यशाळेच्या कार्यक्रमाची पार्श्वभूमी दिली. या कार्यशाळेत आतंरराष्ट्रीय जलव्यवस्थापन संस्थेचे मानद सदस्य आणि केंद्राचे प्रतिनिधी डॉ. अलोक सिक्का, आनंद कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एम. सी. वार्ष्णेय, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे डॉ. ए. के. सिंग, निती आयोगाचे डॉ. निलम पटेल या तज्ञांनी पारंपारिक शेती, नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, आधुनिक विज्ञान व उच्च तंत्रज्ञान शेतीविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि आयआयटी, कानपूर सोबत कृषि महाविद्यालय, पुणे येथे सेंटर फॉर एक्सलन्स स्थापन करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे स्थापन होणाऱ्या सेंटरचा फायदा शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच उद्योजक यांची क्षमता वाढविणे आणि विपणनासाठी मदत करणे याचबरोबर शाश्वत आणि प्रगत अशा कृषि पायाभुत सुविधा विकसीत करण्यासाठी होणार आहे. या कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे व सामंजस्य कराराचे समन्वयक म्हणून कास्ट प्रकल्पाचे सर्व संशोधन सहयोगी यांनी काम पाहिले.

## ऑस्ट्रेलियातील मरडॉक विद्यापीठाबरोबर राहुरी कृषि विद्यापीठाचा सामंजस्य करार



**दि. १५ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व ऑस्ट्रेलियातील मरडॉक विद्यापीठ यांच्यामध्ये मुंबई येथे सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, ऑस्ट्रेलियाचे संस्कृती, कला व आंतरराष्ट्रीय शिक्षण विभागाचे मंत्री श्री. डेव्हिड टेम्पलमन उपस्थित होते. यावेळी झालेल्या सामंजस्य करारावर संशोधन व विस्तार शिक्षण

संचालक डॉ. शरद गडाख व आंतरराष्ट्रीय मरडॉक विद्यापीठाचे कुलपती श्री. केली स्मिथ यांनी सह्या केल्या. याप्रसंगी मरडॉक विद्यापीठाचे संचालक डॉ. राजीव वार्ष्णेय, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर व कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते. ऑस्ट्रेलियन चमूचे नेतृत्व पश्चिम ऑस्ट्रेलियन प्रांताचे उपमुख्यमंत्री व पर्यटन, व्यापार आणि विज्ञान मंत्री श्री. रॉजर कुक यांनी केले. या सामंजस्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांमध्ये कृषि शिक्षण व संशोधनाची देवाण–घेवाण होणार आहे. यामध्ये दोन्ही विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व शास्त्रज्ञ यांना एकमेकांच्या विद्यापीठांतर्गत अभ्यास करता येईल. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यावेळी म्हणाले की या सामंजस्य करारामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्यातून कृषि क्षेत्रामधील नाविन्यपूर्ण कौशल्य आत्मसात करण्याची मोठी संधी प्राप्त होणार आहे. डॉ. राजीव वार्ष्णेय यांनी सांगितले की या करारामुळे मरडॉक विद्यापीठाला महात्मा फुले कृषि विद्यापीठाबरोबर काम करण्याची संधी मिळणार आहे. श्री. डेव्हिड टेम्पलमन यांनीही या सामंजस्य करारावर समाधान व्यक्त केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व ऊस संशोधन संस्था, लखनऊ यांच्यामध्ये सामंजस्य करार



**दि. १३ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व लखनऊ येथील अखिल भारतीय समन्वीत ऊस संशोधन संस्था यांच्यामध्ये सामजंस्य करार करण्यात आला. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी दीर्घकालीन संशोधन करणे, वैज्ञानिक विचारांची देवाण–घेवाण करणे, विद्यापीठातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मार्गदर्शन करणे व संयुक्त प्रशिक्षण घेणे इत्यादी उपक्रम संयुक्तरीत्या राबविण्यासाठी सदरचा सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. या कराराद्वारे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि अखिल भारतीय ऊस संशोधन संस्था यांचे संयुक्त विद्यमाने कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनो तंत्रज्ञान, पीक संरक्षण, पीक शरीरक्रिया शास्त्र, जैव रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान इत्यादी संशोधन प्रकल्प हाती घेतले जातील. संशोधनाचे कामात दोन्ही संस्था एकमेकांना सहकार्य करतील तसेच या कराराअंतर्गत दोन्ही संस्थेचे उच्च शिक्षण घेणारे पदव्युत्तर व पीएचडी विद्यार्थी आणि संशोधक यांना संशोधन करण्यासाठी मदत केली जाईल व शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. या अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे

संशोधन करण्यास वाव देणे, विविध विषयावर प्रशिक्षण कार्यशाळा भरविणे, शेतकरी मेळावे घेणे, विस्तार शिक्षण, नवनवीन तंत्रज्ञान यासंदर्भात संधी उपलब्ध होणार असून त्याचा आपले राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी आणि विद्यार्थी यांना फायदा होणार आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा करार करण्यात आला. या कराराचे वेळी संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर आणि ऊस पैदासकार डॉ. रामदास गारकर हे उपस्थित होते. तसेच अखिल भारतीय ऊस संशोधन संस्था, लखनऊ यांच्या वतीने प्रवरानगर येथील जैविक नियंत्रण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. ज्ञानेश्वर बोरसे आणि डॉ. योगेश थोरात उपस्थित होते.

## अभिनंदन

## डॉ. सुनिल गोरंटीवार वसंतराव नाईक कृषि पुरस्काराने सन्मानीत



**दि. १ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार यांना कृषि दिनी मुंबई येथे नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झालेल्या कार्यक्रमात वसंतराव नाईक कृषि पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. वसंतराव नाईक कृषि संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या १०९ व्या जन्मदिनानिमित्त सदरील पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सदरचा पुरस्कार दक्षिण आशिया जैविक तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. चारुदत्त मायी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बारवाले, कार्याध्यक्ष श्री. अविनाश नाईक, कोषाध्यक्ष डॉ. बकुळ पटेल उपस्थित होते.

डॉ. गोरंटीवार हे जागतिक बँक अर्थसहाय्यीत कास्ट प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक म्हणुन काम पहात आहेत. ३८ वर्षाच्या सेवेत त्यांनी विविध पदांवर काम केले आहे. डॉ. गोरंटीवार यांनी ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी इलर्निंग मॉडेल तयार करुन १८० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय प्रशिक्षणे, कार्याशाळा, व्याख्याने यांचे आयोजन या मॉडेलच्या माध्यमातून केले. याचा लाभ ६०००० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय स्तरावरील विविध शिक्षक संस्थामधील विद्यार्थी, प्राध्यापक आणि शेतकरी वर्गांनी लाभ घेतला. तसेच कास्ट प्रकल्पांतर्गत विकसीत केलेल्या विविध नाविन्यपूर्व डिजीटल तंत्रज्ञानामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. डॉ. गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली कास्ट प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या ड्रोन, रोबोटीक्स, आयओटी आणि हायपरस्पेक्ट्रल प्रयोगशाळा विकसीत करण्यात आल्या. तसेच

विविध नाविण्यपूर्ण डिजीटल तंत्रज्ञानाचा प्रसार शेतकऱ्यांपर्यंत करुन हवामान अद्ययावत डिजीटल गावे या संकल्पनेसाठी कास्ट प्रकल्पांतर्गत ११ गावे दत्तक घेतली आहेत. नुकतीच भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाद्वारे स्थापन केलेल्या ड्रोन संबंधीत समितीवर त्यांची सदस्य म्हणुन भारत सरकारने नेमणूक केली आहे. डॉ. सुनिल गोरंटीवार यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे आणि नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी अभिनंदन केले आहे.

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथील रोपवाटिकेला राष्ट्रीय फलोत्पादन बोर्डाची मान्यता



**दि. १५ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या गणेशखिंड, पुणे येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या रोपवाटिकेस दोन स्टार मान्यताप्राप्त रोपवाटिका म्हणून मान्यता मिळाल्याचे भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयांतर्गत असलेल्या राष्ट्रीय फलोत्पादन बोर्डाने कळविले आहे. दि. १७ मे, २०२२ रोजी राष्ट्रीय फलोत्पादन बोर्डाने नियुक्त केलेल्या समितीने विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या रोपवाटिकेचे नियमानुसार विविध मुद्द्यांच्या आधारे परीक्षण केले. त्यानुसार राष्ट्रीय फलोत्पादन बोर्डाने नुकतेच पत्र पाठवून सदरच्या रोपवाटिकेस आंबा, पेरू, डाळिंब, लिंबू व सिताफळ या फळपिकांच्या विविध वाणांची उत्कृष्ट प्रतीची कलमे तयार करणे कामी दोन स्टार मान्यताप्राप्त रोपवाटिका म्हणून मान्यता मिळाल्याचे कळविले आहे. गणेशखिंड येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. विनय सुपे व त्यांच्या चमूचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख आणि अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी अभिनंदन केले आहे.

## राष्ट्रीय व्यवस्थापन स्पर्धेत कृषि महाविद्यालय, पुणे येथील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दि. ७ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, पुणे येथील कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात पदवी शिक्षण घेत असलेले विद्यार्थी तामिळनाडू कृषि विद्यापीठ, कोईमतूर येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय व्यवस्थापन स्पर्धा २०२२ मध्ये सहभागी झाले होते. सदर बैठकीत प्रबंदाज २०२२ घटकांतर्गत व्यवसाय नियोजक म्हणून शांकीकुमार आणि कृष्णा देशमुख यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषक मिळविले आहे. उत्तम व्यवस्थापक





म्हणून अमित पाटील आणि मनुष्यबळ व्यवस्थापन स्पर्धेत कु. श्रेया फडतरे आणि आकाश क्षीरसागर यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषक मिळविले आहे. तामिळनाडू कृषि विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. व्ही. गीतालक्ष्मी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांच्या यशाबद्दल आणि शिस्तबद्ध वागणुकीबाबत विशेष कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धामध्ये विजेत्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. संजय भोसले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल सहभागी स्पर्धकांचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख व अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी अभिनंदन केले.

## राहुरी कृषि विद्यापीठाच्या कृषि अभियांत्रिकी पदवीस ए.आय.सी.टी.ई. ची मान्यता



**दि. १४ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील कृषि अभियांत्रिकी ह्या पदवीस ए.आय.सी.टी.ई. ची मान्यता मिळाली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ भारतातील तिसरे कृषि विद्यापीठ आहे की ज्यांच्याद्वारे सुरु असलेल्या कृषि अभियांत्रिकीच्या पदवीस ए.आय.सी.टी.ई. ने मान्यता दिली आहे. या पूर्वी पंतनगर व उदयपूर या विद्यापीठाद्वारे सुरु असलेल्या कृषि अभियांत्रिकीच्या पदवीस ए.आय.सी.टी.ई. ने मान्यता दिली आहे. या मान्यतेमुळे कृषि अभियांत्रिकी पदवीधर हे इतर अभियांत्रिकी पदवीधारकांप्रमाणे

विज्ञान व तंत्रज्ञान विभाग आणि इतर शासकीय योजनांचा लाभ घेऊ शकतील. तसेच महाविद्यालयास भारत सरकारच्या तंत्रज्ञान शिक्षण गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत लाभ मिळेल. सदर मान्यतेसाठी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली समिती स्थापन करण्यात आली होती. त्यात समितीचे अध्यक्ष डॉ. सचिन नलावडे तसेच सर्व सदस्य व महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कुलगुरु डॉ पी.जी. पाटील यांनी त्यांच्या व्यस्त कार्यक्रमामधून वेळ काढून आवश्यक ते प्रमाणपत्र तसेच कागदपत्रे पारित केली. संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे व विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके यांचेही यासाठी मोलाचे सहकार्य लाभले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या वतीने भा.कृ.अ.प. चे नवनियुक्त महासंचालक डॉ. हिमांशु पाठक यांचा सत्कार



**दि. २९ जुलै, २०२२.** बारामती येथील राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. हिमांशु पाठक यांची नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या महासंचालकपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे यापुर्वीचे महासंचालक डॉ. त्रिलोचन महापात्रा यांचा कार्यकाल संपल्यामुळे डॉ. हिमांशु पाठक यांची त्यांच्या जागी नियुक्ती करण्यात आलेली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या वतीने विद्यापीठाचे नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे, कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल आणि कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार या अधिकाऱ्यांनी डॉ. हिमांशु पाठक यांचा बारामती येथे शाल, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. पाठक यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर सदस्य म्हणुन कार्य केले आहे.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथील विद्यार्थ्यांना फिक्की फ्लो पुणे चापटर यांची शिष्यवृत्ती

**दि. ११ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि फिक्की फ्लो पुणे चापटर, पुणे यांचेमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार कृषि महाविद्यालय, पुणे येथील गरीब, हुशार व होतकरू अशा ७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी



रु.६२,१००/– प्रमाणे सन २०१९ पासून शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीमुळे गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना चांगलाच फायदा होत असून त्यांच्यात अभ्यासूवृत्ती आणि सामाजिक योगदानाबद्दल प्रेरणा निर्माण झाली आहे. या वर्षी फिक्की फ्लो पुणे चापटर, पुणे येथी महिला संचालक मंडळातील अध्यक्ष, सचिव व इतर संचालक यांचे हस्ते सदर शिष्यवृत्तीचा धनादेश सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांचेकडे सुपूर्त करण्यात आला. सदर बाब विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी चालना देणारी आहे असे मत कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी व्यक्त केले.

## कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. दत्तात्रय उगले यांची पुणे कृषि महाविद्यालयाला भेट



**दि. १ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. दत्तात्रय उगले यांनी कृषि दिनाचे औचित्य साधून कृषि महाविद्यालय, पुणे येथील विविध उपक्रमांना भेट दिली व आढावा घेतला. सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी जैव नियंत्रण प्रयोगशाळा, हवामानशास्त्र विभाग, जैविक नत्र स्थिरीकरण योजना, अळिंबी उत्पादन प्रकल्प, उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला उत्पादन प्रकल्प, उतीसंवर्धन प्रयोगशाळा,

पाटबंधारे मॉडेल इत्यादी उपक्रमांची माहिती घेतली. सद्यपरिस्थितीत रासायनिक घटकांचा शेतीमधील वापर कमी करून विषमुक्त शेती उत्पादन पद्धतीचा अवलंब करण्यासाठी जीवाणू खतांचा वापर अनिवार्य असल्याचे सांगून त्यासाठी जैविक नत्र स्थिरीकरण योजनेच्या माध्यमातून सुरु असलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी जैव नियंत्रण प्रयोगशाळा समन्वयक डॉ. बडे, हवामानशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्थुल, जैविक नत्र स्थिरीकरण योजना प्रमुख डॉ. हसबनीस, अळिंबी उत्पादन प्रकल्प प्रमुख डॉ. जाधव, उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला उत्पादन प्रकल्प प्रमुख डॉ. सचिन चव्हाण, उतीसंवर्धन प्रयोगशाळा प्रमुख डॉ. हितेंद्र रजपूत, पाटबंधारे मॉडेल समन्वयक डॉ. बनसोड उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात नामांकित कंपनीचे कॅम्पस मुलाखतीचे आयोजन



**दि. २८ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पदव्युत्तर महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट विषयीचे दोन दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले. नवी दिल्ली स्थित टर्मिनिक्सीस सीस इंडीया या कंपनीद्वारे आयोजीत केलेल्या या शिबीरासाठी महाविद्यालयातील ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोकरीसाठी नाव नोंदणी केली. या सर्व विद्यार्थ्यांची लेखी परिक्षा व मुलाखतीतून अंतीम निवड केली. निवड प्रक्रिया दोन दिवसात पार पडणार असल्याचे कंपनीच्या वतीने वरिष्ठ अधिकारी एच.आर. मॅनेजर श्री. पंकज सिंन्हा व सहाय्यक व्यवस्थापक श्री. मुकुंद मोरे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे यांनी महाविद्यालयाच्या उपक्रमाबाबत माहिती दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. बी.बी. ढाकरे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. व्ही.एस. पाटील व तांत्रिक अधिकारी डॉ. सुनिल भणगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन प्लेसमेंट अधिकारी डॉ. भरत भालेराव यांनी केले.

## जबलपुर येथे सौर उर्जा सिंचन योजनेच्या प्रशिक्षणासाठी शेतकरी, विद्यार्थी व प्राध्यापक रवाना

**दि. २७ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत प्राध्यापक, विद्यार्थी व शेतकऱ्यांसाठी सौर उर्जा सिंचन योजना या विषयावर तीन दिवसांच्या क्षमता विकास प्रशिक्षणासाठी जबलपुर– मध्यप्रदेश येथे बोरलॉग इंस्टिट्युट ऑफ साउथ एशिया (बीसा) या संस्थेत ३० प्रशिक्षणार्थींची पहिली तुकडी रवाना झाली आहे. या तीन दिवसांच्या प्रशिक्षणात बोरलॉग इंस्टिट्युटचे प्रमुख डॉ. पंकज सिंह व त्यांचे नवी दिल्ली येथील सहकारी श्री. परेश शिरसाठ हे प्रशिक्षण देणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या सूचनेनुसार व अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कास्ट–कासमचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल






गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी व शेतकरी यांच्यासाठी सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या या पहिल्या तुकडीच्या बसला संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी निरोप दिला. यावेळी डॉ. शरद गडाख म्हणाले की या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारच्या सिंचन पध्दतींमध्ये केलेला सोलरचा उपयोग या संबंधीचा अभ्यास करता येणार आहे. यामुळे सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांच्या संपर्कात येणाऱ्या इतर शेतकऱ्यांमध्येही सौर उर्जेचा सिंचन पध्दतींमध्ये होणाऱ्या वापराविषयी जागृती होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी कास्ट प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, सहप्रमुख डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते. सदरील प्रशिक्षणासाठी गेलेल्या तुकडीचे नेतृत्व डॉ. सुनिल कदम यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, कराड येथे कृषि दिन कार्यक्रम संपन्न



**दि. १ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कराड येथील कृषि महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंतीनिमित्त कृषि दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र सुर्यवंशी उपस्थित होते. यावेळी डॉ. सुर्यवंशी मार्गदर्शन करतांना म्हणाले की वसंतराव नाईक यांनी

कृषिक्षेत्रासाठी मोलाचे योगदान दिले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग करुन शेतीसंबंधीत व्यवसाय उभे करुन स्वयंपूर्ण झाले पाहिजे. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. ज्योती वाळके, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बिभीषण पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. इंदिरा घोनमोडे, सहाय्यक कुलसचिव श्री. सुहास हरळे व सहाय्यक नियंत्रक श्री. रविंद्रनाथ चोथे उपस्थित होते. याप्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

## कराड कृषि महाविद्यालयात बौध्दिक संपदा हक्क या विषयावरील चर्चासत्र संपन्न




**दि. ३ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कराड येथील कृषि महाविद्यालयाचा वर्धापन दिन तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त बौध्दिक संपदा हक्क या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र सुर्यवंशी उपस्थित होते. याप्रसंगी मुंबई येथील भारतीय पेटंट कार्यालयाचे पेटंट व डिझाईन परिक्षक श्री. अतुल खाडे, डॉ. इंदिरा घोनमोडे व श्री. सुहास हरळे उपस्थित होते. यावेळी डॉ. राजेंद्र सुर्यवंशी मार्गदर्शन करतांना म्हणाले की विद्यार्थ्यांनी कृषि क्षेत्रातील पदवी प्राप्त केल्यानंतर कृषि विकासावर लक्ष केंद्रित करावे. श्री. अतुल खाडे यांनी यावेळी कृषि शास्त्रज्ञांनी नाविन्यपूर्ण संशोधनातून पेटंट मिळविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. समीर ढगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतिश बुलबुले यांनी तर डॉ. इंदिरा घोनमोडे यांनी आभार मानले.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे हरितगृह तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दि. ५ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, पुणे येथील उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला उत्पादन प्रकल्प हा एक महत्वाचा प्रकल्प आहे. हरितग्रह व्यवसायामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची वाढती मागणी लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास होण्याच्या दृष्टीने कृषि पदविका उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सहा महिने कालावधीसाठी हरितगृह तंत्रज्ञान या विषयावर निवासी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात व्यावसायिक हरीतगृह उभारणी, हरीतगृह अर्थशास्त्र, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड रोग नियंत्रण, हरीतगृहातील




वातावरण नियंत्रण, स्वयंचलित मशीनद्वारे पाणी व खत व्यवस्थापन, हरीतगृह उत्पादन तंत्रज्ञान आणि विक्री व्यवस्था या विषयांवर प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षणामध्ये प्रात्यक्षिक ज्ञानावर भर देण्यात येत असल्यामुळे सहभागी प्रशिक्षणार्थींना वातावरण सापेक्ष बदलांचे व्यवस्थापन करून गुणवत्तावर्धक उत्पादन घेण्यासाठी प्रशिक्षणाचा चांगला फायदा होतो. सदर प्रकल्पात प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींची अजित सीड्स, न्युट्रीफ्रेश, अक्काग्रीन प्लस अशा विविध कंपन्यामध्ये सुपरवायझर पदावर निवड होऊन त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

## कृषि विज्ञान केंद्र,धुळे प्रक्षेत्रावर ड्रोन प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**दि. २९ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, धुळे, कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि सिंजेटा इंडीया प्रा.ली. यांचे संयुक्त विद्यमाने ड्रोन प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम कृषि विज्ञान केंद्र, धुळे प्रक्षेत्रावर संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी.डॉ. चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, धुळे हे होते तसेच व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीमध्ये श्री.शांताराम मालपुरे, उपविभागीय कृषि अधिकारी, धुळे, डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, धुळे श्री. तुकाराम औटी,विभागीय विक्री प्रमुख, सिंजेटा, धुळे, कृषि महाविद्यालयचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ, कृषि तंत्र विद्यालाचे कर्मचारी, अधिकारी,

कर्मचारी, सिंजेटा, धुळे, तसेच धुळे जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी, शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य, विद्यार्थी, विद्यार्थिनी आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. श्री. औटी यांनी ड्रोन फवारणी प्रात्यक्षिकाचा उद्देश सांगितला. सिंजेटा, धुळेच्या चमूने कृषि विज्ञान केंद्राच्या सोयाबीन बिजोत्पादन प्रक्षेत्रावर ड्रोन फवारणी तंत्रज्ञान प्रात्यक्षिक, तसेच ड्रोन उडवण्यापूर्वी आणि खाली उतरवतानाही काय काळजी घ्यायची याविषयी उपस्थितांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकामधून मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.चिंतामणी देवकर यांनी ड्रोन तंत्रज्ञान समजून घेऊन, त्यामधील तांत्रिक बाबींचे अवलोकन करून, कमी काळात अधिक प्रभावी वापर आणि अधिकतम लाभ याचे उदाहरण असणारे असे ड्रोन तंत्र शेतीत कृषि उत्पादन खर्च कसा कमी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. या मेळाव्याचे आभार प्रदर्शन डॉ. पंकज पाटील यांनी मानले.

## अदिवासी उपयोजनेतर्गत बाजरी संशोधन योजनेतर्फे शेतकऱ्यांना शेती साहित्याचे वाटप




**दि. १३ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वयीत बाजरी संशोधन योजना, कृषि महाविद्यालय, धुळे व प्रकल्प समन्वयक, अखिल भारतीय समन्वयीत बाजरी संशोधन प्रकल्प, मंडोर, जोधपूर, राजस्थान यांच्या मार्फत अदिवासी उपयोजनेतून प्रतापपूर, ता. नवापूर जि. नंदुरबार येथील २५ शेतकऱ्यांना शेती साहित्याचे वाटप करण्यात आले. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविल्या जाणाऱ्या अदिवासी उपयोजनेतून अदिवासी समाजाचे शैक्षणिक, आर्थिक विकास व राहणीमान उंचावण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. यावेळी २५ शेतकऱ्यांना प्रत्येकी एक औषध फवारणी यंत्र, फुले आदीशक्ती बाजरी बियाणे व विद्यापीठाची कृषिदर्शनीचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम कृषि महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी शास्त्रज्ञ डॉ. के.के. बऱ्हाटे, प्रा. रविंद्र सूर्यवंशी यांनी बाजरी पीक तंत्रज्ञान व विविध पिकांच्या लागवड व व्यवस्थापन तसेच एकात्मिक शेती पध्दती व इतर योजनांबाबत माहिती दिली. श्री. मोहनदास गावीत यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला डॉ. सी.एस. ठाकरे, श्री. पी.वाय. पाटील, प्रतापपूर गावातील प्रगतीशील शेतकरी श्री. विनायक गावित, लाभार्थी शेतकरी व परिसरातील शेतकरी बांधवांसह प्रतापपूर ग्रामस्थ उपस्थित होते.

## जळगाव जिल्ह्यातील गौऱ्यापाडा येथे कृषि निविष्ठांचे वाटप



**दि. १२ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्र व अखिल भारतीय भुईमुग संशोधन केंद्र, जुनागड यांच्या संयुक्त विद्यमाने चोपडा तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगेतील गौऱ्यापाडा या अदिवासी गावात जैविक खते, किटकनाशके व शेंगा फोडणी यंत्र या निविष्ठांचे वाटप करण्यात आले. या योजनेसाठी तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एस.एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विस्तार केंद्राचे प्रमुख प्रा. पोपट खंडागळे यांनी यावेळी शेतकऱ्यांना सोयाबीन, मका व भुईमुग या पिकातील जैविक व्यवस्थापनाविषयी माहिती दिली. अदिवासी शेतकऱ्यांना या योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्ष लाभ झाला असून गौऱ्यापाडा येथील लाभार्थी शेतकऱ्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. दिनेश पाटील यांनी केले.

## बोपगाव येथे सिताफळ शेतीशाळा



**दि. १४ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी आणि तालुका कृषि अधिकारी, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे बोपगाव येथे सिताफळ बहार व

कीड–रोग व्यवस्थापन याविषयी शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथील वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री.सुनील नाळे यांनी सिताफळ बहार व्यवस्थापन तर सिताफळ रोग कीड नियंत्रण याविषयावर श्री. नितीश घोडके यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री. गणेश जगताप, कृषि पर्यवेक्षक, सासवड यांनी फळबागलागवडी संदर्भात असलेल्या शासकीय योजनांची माहिती दिली. सदर कार्यक्रमाला शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## पुणे कृषि महाविद्यालयातील रक्तदान शिबिरास भरघोस प्रतिसाद



**दि. २५ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, पुणे येथे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व मुकुल माधव फौंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास भरघोस प्रतिसाद मिळाला. रक्तदान शिबिरादरम्यान एकूण ८८ जणांनी रक्तदान केले. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या ३६ स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेनेच्या १२ छात्रांसह ४० प्राध्यापक, कर्मचारी व इतर व्यक्तींनी रक्तदान केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर, डॉ. अरुण कांबळे, उपाध्यक्ष, विद्यार्थी परिषद, डॉ. प्रमोद पाटील, विद्यार्थी कल्याण अधिकारी, मुकुल माधव फौंडेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. बबलू मोकाळे, व्यवस्थापिका श्रीमती यास्मिन शेख व जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. आशुतोष काळे, स्वयंसेवक, छात्र, विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिराचे औचित्य साधत डॉ. आशुतोष काळे यांनी सर्व उपस्थितांना थॅलेसॅमिया या रक्तातील दुर्धर आजाराविषयी व तो टाळण्याकरीता करावयाच्या साध्या सोप्या उपायांविषयी मार्गदर्शन केले.

## शेतकरी–शास्त्रज्ञ मंच बैठकीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दि. ८ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील आखिल भारतीय समन्वीत फळपिके संशोधन प्रकल्पाच्या शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाच्या बैठकीचे आयोजन गोपाळपूर (खामगाव), ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते. या बैठकीमध्ये लिंबुवर्गीय फळपिक लागवड तंत्रज्ञान व किड आणि रोग व्यवस्थापन तसेच मोसंबी पिकाची लागवड या विषयी प्रकल्पातील शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद पाचणकर व डॉ. सतिश जाधव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. रणजीत कडू यांनी लिंबुवर्गीय फळपिकांमध्ये जैविक किडींचा वापर आणि मित्र किडींचे संगोपन या विषयी मार्गदर्शन केले. वनस्पतीरोग शास्त्रज्ञ प्रा. मधुकर शेटे यांनी मोसंबी पिकावरील रोगाविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर शिवार फेरीचे





आयोजन करुन शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण केले. यावेळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांना फळपिके संशोधन प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या संशोधनात्मक शिफारशींची तांत्रिक माहिती त्याचबरोबर प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. या बैठकीसाठी गोपाळपूर पंचक्रोशीतील मोसंबी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. साहेबराव ताठे यांनी शेतकरी व शास्त्रज्ञांचे आभार मानले. ही बैठक यशस्वी होण्यासाठी कृषि विभागाचे कृषि सहाय्यक श्री. गायकवाड व श्री. फुलारी यांनी विशेष सहकार्य केले.

## शेर-ए-काश्मीर विद्यापीठातील कार्यशाळेत कृषि विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग





**दि. २९ जुलै, २०२२.** जम्मू काश्मीर येथील शेर-ए-काश्मीर विद्यापीठात दि. १४ ते २८ जुलै, २०२२ या दरम्यान नवी दिल्ली येथील विज्ञान आणि अभियांत्रिकी संशोधन मंडळाद्वारे अनुदानप्राप्त ॲक्सलरेट विज्ञान या योजनेतंर्गत शेर-ए-काश्मीर कृषि विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने फळपिकांना लागण करणाऱ्या वनस्पतींमधील रोग शोधण्यासाठी आण्विक तंत्राचा वापर या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत देशभरातून

वनस्पती रोगशास्त्र, किटकशास्त्र व कृषि जैव तंत्रज्ञान या विषयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळेसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभागाच्या कु. मुक्ता जोशी, मुकुंद डवले व एस.व्ही. सहाना या तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ व विभाग प्रमुख डॉ. तानाजी नरुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत आधुनिक आण्विक तंत्रज्ञान आणि थंड प्रदेशातील फळझाडांचे रोग, त्यांची ओळख व निदान करण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान शिकविण्यात आले. यासाठी विविध तज्ञांचे मार्गदर्शन आयोजीत करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रयोगशाळेतील विविध उपकरणे, त्यांची हाताळणी आणि रोगाचे निदान करण्यासाठीच्या चाचण्या जसे की एलिसा, आर.टी.पी.सी.आर., जेल–इलेक्ट्रोफोरेसीस व त्यांचे विविध प्रकार, जनुक संश्लेषण, निदान करतेवेळी घ्यावयाची काळजी यासारख्या अनेक नविन तंत्रज्ञानाचे आजच्या काळातील महत्व व उपयोग यासारखे तंत्रज्ञान शिकविण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये सर्व सोयी सुविधांनी युक्त प्रयोगशाळा उपलब्ध असून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पुढील संशोधनासाठी या कार्यशाळेचा उपयोग होणार आहे.

## जाधववाडी येथील संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**दि. १ जुलै, २०२२.** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या जाधववाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्राच्या संशोधन प्रक्षेत्रावर दि. १ ते ७ जुलै या कालावधीत कृषि दिन सप्ताहाचे औचित्य साधून शेतकरी–शास्त्रज्ञ मंच बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीदरम्यान संशोधन केंद्र प्रमुख डॉ. प्रदीप दळवे यांनी कृषिदिनाचे तसेच वृक्षारोपणाचे महत्त्व विषद करून शेतकऱ्यांनी आपल्या शिवारात जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचे आवाहन केले. तसेच अंजीर आणि सिताफळ पिकातील बहार व्यवस्थापन, हवामानातील बदलामुळे उद्भवणाऱ्या समस्या व उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. नितीश घोडके यांनी अंजीर आणि सिताफळ पिकातील एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन तर श्री. सुनील नाळे यांनी नविन फळबाग लागवडीविषयी माहिती दिली. बैठकीच्या समारोपानंतर शेतकरी शास्त्रज्ञ मंच सदस्यांच्या हस्ते जाधववाडी येथील संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष व प्रगतीशील शेतकरी श्री. देवराम काळे, मंचाचे सदस्य व शास्त्रज्ञ उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि दिन व रक्तदान शिबिराचे आयोजन





**दि. १ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, धुळे येथे वसंतराव नाईक जयंती व कृषि दिन साजरा करण्यात आला. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सी. डी. देवकर यांच्याहस्ते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच कृषिदिनाचे औचित्य साधून कृषि महाविद्यालय, धुळे व रोटरी क्लब, धुळे क्रॉसरोड यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी रक्तदात्यांची हिमोग्लोबिन व रक्तगट चाचणी करण्यात आली. या शिबिरामध्ये कृषि महाविद्यालयातील एकूण ५० विद्यार्थी–विद्यार्थिनी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. जितेंद्र सुर्यवंशी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. सुनिल पाटील आणि प्रा. विपुल वसावे, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, ले. पी. बी. देवरे, राष्ट्रीय छात्र सेना, प्रा. के. बी. पाटील, शारीरिक शिक्षण निदेशक यांनी विशेष प्रयत्न केले.

## धुळे कृषि महाविद्यालयात वन महोत्सव सप्ताह आणि वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**दि. ५ जुलै, २०२२.** हरितक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त धुळे कृषि महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्रीमती एस. भुवनेश्वरी,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, श्री. दि. वा. पगार, मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, धुळे, श्री. व्ही.व्ही. होशिंग, उपवनसंरक्षक,धुळे, श्री. रमेश मिसाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी, धुळे, श्री. प्रदिप पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. धुळे, श्री. वाघ, गटविकास अधिकारी, धुळे, श्री. संजय पाटील, सहाय्यक वनसंरक्षक, धुळे, श्री. महेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक, धुळे, सौ. सुजाता बोरसे, विस्तार अधिकारी, जि. प. धुळे हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे होते. याप्रसंगी बोलताना श्रीमती भुवनेश्वरी यांनी रस्त्याच्या दुतर्फा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, शाळा– महाविद्यालये परिसरात औषधी व बहुउपयोगी वृक्षांची लागवड करावी असे उपस्थितांना आवाहन केले. त्यानंतर श्री. पगार यांनी वनसंवर्धनाचे महत्व सांगून एका व्यक्तीने कमीतकमी १० वृक्षांची लागवड व संवर्धन करण्याचे आवाहन केले. श्री. मिसाळ यांनी कृषि महाविद्यालयात चाललेल्या विविध उपक्रमांबाबत समाधान व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. देवकर यांनी कृषि महाविद्यालयात चालू असलेल्या विविध उपक्रमांबद्दल आणि वृक्ष लागवडीबाबत उपस्थितांना माहिती दिली. या वन महोत्सव सप्ताहा दरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जांभूळ, चिंच, आवळा, कडूनिंब, शिसम, सीताफळ, चाफा, खैर, बांबू इ. विविध प्रजातींची एकूण ५०० हून अधिक वृक्ष लागवड करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी – विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. सुनिल पाटील आणि प्रा. विपुल वसावे, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, ले. पी. बी. देवरे, राष्ट्रीय छात्र सेना, प्रा. जितेंद्र सुर्यवंशी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, प्रा. के. बी. पाटील, शारीरिक शिक्षण निदेशक यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा. जितेंद्र सुर्यवंशी यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. संदीप पाटील यांनी केले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे अंतर्गत शेतकरी पशुपालक यांच्यासाठी रात्रीची कार्यशाळा संपन्न



**दि. २७ जुलै, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि जयराम दहिवद वि.का.सोसायटी लि.दहिवद यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवसीय रात्रीची कार्यशाळा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय या विषयावर प्रशिक्षण संपन्न झाले. सदर कार्यशाळा डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांचे अध्यक्षतेखाली झाली. प्रमुख उपस्थितीमध्ये श्री. नरेंद्र पाटील, अध्यक्ष, जयराम दहिवद वि.का. सोसायटी लि.दहिवद, मार्गदर्शक डॉ धनराज चौधरी, शास्त्रज्ञ, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र, कृषि विज्ञान केंद्र, धुळे, डॉ.अतिश पाटील, शास्त्रज्ञ,मृद विज्ञान व

कृषि रसायन शास्त्र, कृषि विज्ञान केंद्र, धुळे तसेच पशुपालक शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक श्री.नरेंद्र पाटील यांनी केले. डॉ. चौधरी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेमधील पशुधनाचे महत्व आणि भविष्यातील संधी याविषयी मार्गदर्शन केले तसेच जनावरांची काळजी, निगा, आहार व्यवस्थापन, चारा उत्पादन तंत्र याविषयी माहिती उपस्थितांना करून दिली. डॉ. पाटील यांनी पशुधन सोबत सेंद्रिय खत उत्पादन तंत्रज्ञान यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. नांद्रे यांनी पशुसंगोपानातून शाश्वत उत्पन्न कसे घेता येऊ शकते या विषयी महात्मा फुले कृषि विद्यापीठ शिफारसित एकात्मिक शेती पध्दती मॉडेल याचे उदाहरण देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच कृषि विज्ञान केंद्र,धुळे राबवीत असलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली. सदर कार्यशाळेत शिरपूर, धुळे येथील पशुपालक शेतकरी यांनी सहभाग नोंदवला.

## माझी वारी, स्वच्छ वारी – २०२२ स्वयंसेवकांचा गौरवसोहळा कृषि महाविद्यालय, पुणे येथे संपन्न






**दि. २७ जुलै, २०२२.** आषाढी एकादशीच्या निमित्ताने देहू आणि आळंदी येथून प्रस्थान होत असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात लाखोंच्या संख्येने वारकरी सहभागी होत असतात. त्यामुळे पालखी मार्गावरील शहरे, गावं, वाडी वस्ती इत्यादीवर अतिरिक्त भार पडत असतो व परिणामी मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आणि कचरा निर्मिती होत असते. त्याचा लोकांच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि रोगराई पसरण्याची शक्यता असते.या समस्येवर मात करण्यासाठी पुणे महानगरपालिका व आदर पूनावाला (स्वच्छतेसाठी पुढाकार) यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वारी, स्वच्छ वारी–२०२२ या उपक्रमाचे आयोजन कृषि महाविद्यालय, पुणे येथील शिरनामे सभागृहात करण्यात आले होते. सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कृषि महाविद्यालय, पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना योजनेचे स्वयंसेवक, पालखी मार्गावरील कदमवाक वस्ती, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, उरळीकांचन इत्यादी ग्रामपंचायती, सासवड नगरपंचायत, विविध स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, वाघिरे महाविद्यालय सासवड इत्यादी घटकांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांचा यथोचित गौरव सन्मानचिंन्ह व मानपत्र देऊन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुणे महानगरपालिका घन कचरा विभागाच्या उप–आयुक्त सौ. आशा राऊत यांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आदर पूनावाला ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णन कोमंडूर होते. या प्रसंगी एम.आय.टी. लोणी काळभोर पुणेचे संचालक डॉ. राहुल मोरे, कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर व्यासपीठावर उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेचे स्वयंसेवक कु. सायली हजारे, कु. नेहा मोहिते आणि श्री. सुदर्शन लाटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. धर्मेंद्र फाळके, सहाय्यक प्राध्यापक, मृदाशास्त्र विभाग यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मंगेश क्षीरसागर यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. मल्हार करवंदे यांनी केले.

## ऑगस्ट महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी व नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (२५ प्रति हेक्टर) शेतात लावावे.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली. किंवा बुप्रोफेझीन २५ मिली. किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- कामगंध सापळ्यामध्ये सतत २-३ दिवस, ८-१० गुलाबी बोंड अळीचे पतंग दिसून आल्यास प्रोफेनोफॉस ५० ई. सी. प्रमाणे २० मिली किवा लम्वडा सायहॅलोथ्रीन ५ ई. सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पायरीक्लोस्ट्रोबीन २० डब्ल्यू. जी. १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा मेटीराम ५.५% + पायरॅब्लोरोस्टोवीन ५% डब्ल्यु.जी. २० ग्रॅम प्रति १० ली. पाण्यात फवारणी करावी.
- मॅग्नेशिअम सुक्ष्म अन्नद्रव्ये २० ते ३० कि.ग्रॅम प्रति हेक्टरी जमिनीत द्यावे. लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास २ टक्के डायअमोनियम फॉस्फेट खताचे द्रावण १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळेस पिकावर फवारावे.
- गुलाबी बोंड अळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.
- कपाशीच्या शेतात पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी किमान २५ पक्षीथांबे उभे करावेत, म्हणजे पक्षी त्यावर बसून शेतातील अळ्या टिपून खातील.

- **ऊस**
- आडसाली उसाच्या लागवडीची कामे १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करावीत.
- लागवडीसाठी दोन सरीमधील अंतर मध्यम जमिनीत १०० सें व भारी जमिनीत १२० सें ठेवावे. पट्टा पध्दतीसाठी मध्यम जमिनीत ७५-१५० सें. व भारी जमिनीत ९०- १८० सें पट्टा पध्दतीचा अवलंब करावा.
- रोगग्रस्त किडग्रस्त शेतातील व खोडव्याचे बेणे लागणीस वापरू नये. ऊस बेणे मळयातीलच चांगले ऊस बेणे निवडून लागणीसाठी वापरावे.
- आडसाली लागण करताना को.८६०३२, को.एम.०२६५ व को. व्ही.एस.आय. ९८०५ या शिफारशीत जातींचा वापर करावा.
- ऊस बेणे लागण करण्यापूर्वी खवले कीड, पिठ्या ढेकूण, लोकरी मावा, पांढरी माशी या किडीच्या नियंत्रणासाठी ३०० मिली मॅलॅथिऑन ५० टक्के प्रवाही अथवा डायमेथोएट २६५ मिली ३० टक्के प्रवाही आणि १०० ग्रॅ बावीस्टीन (०.१ टक्के) १०० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १० मिनिटे बुडवावे आणि तेच बेणे परत १०० लिटर पाण्यात १० किलो प्रति हेक्टरी ॲसेटोबॅक्टर डायॲझोट्रॉपिकस आणि १.२५ किलो स्फुरद विरघळविणारे जिवाणु प्रति हेक्टरी याप्रमाणे मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवून ठेवावे व नंतर लागणीसाठी वापरावे, त्यामुळे नत्राच्या मात्रेत ५०% व स्फुरदाच्या मात्रेत २५% इतकी बचत होते.
- वाळवी, खोडकिड व मुळे पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही २.५ लिटर १००० लिटर पाण्यात मिसळून ऊस लागणीनंतर वापश्यावर सरीतून प्रति हेक्टरी ओतावे.
- ऊस लागणीकरीता उसाच्या एक डोळा अथवा दोन डोळा टिपरीचा वापर करावा.

- उसावरील पोक्का बोईंग या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ०.३० टक्के मॅन्कोझेब या बुरशीनाशकाच्या ३ फवारण्या १२ दिवसाच्या अंतराने कराव्यात.
- हुमणी किडीचा बंदोबस्त करण्यासाठी, हुमणीग्रस्त शेतातील वाळलेली पिकांची रोपे उपटावीत. जमिनीत मुळाशेजारी मिळालेल्या अळया गोळा करुन रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून माराव्यात. तसेच दाणेदार फोरेट १० टक्के २५ किलो किंवा कार्बोफ्युरॉन ३ टक्के किटकनाशक हेक्टरी १५ किलो या प्रमाणात वापरावे.
- आडसाली उसाची लागण केल्यानंतर जमिनीत वापसा आलेनंतर (साधारण ३-४ दिवसांनी) उसातील तणांच्या बंदोबस्तासाठी एकरी २ किलो अॅट्रेझीन (अॅट्रॅटॉप) किंवा ६०० ग्रॅ मेट्रीब्युझीन(सेंकॉर) ५०० लिटर पाण्यात मिसळून संपुर्ण क्षेत्रावर फवारणी करावी.
- आडसाली उसाला लागवडीचे वेळी शिफारशीतील मात्रेच्या १० टक्के नत्र, ५० टक्के स्फुरद, ५० टक्के पालाशयुक्त खताची मात्रा द्यावी. उसासाठी नत्रयुक्त खतासाठी निमकोटेड युरियाचा वापर करावा.

- **कडधान्य पिके**
- **मूग आणि उडिद**
- फुलकळी लागण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत गरजेनुसार शिफारशीत किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत. यासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के एस एल ६२५ मि.ली. + पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्रॅम ५०० लिटर पाणी / हेक्टरी मिसळून फवारणी करावी.
- पाऊस नसल्यास संरक्षित पाणी द्यावे. अथवा २ टक्के युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.

**तूर**

- किड व रोग नियंत्रणासाठी एकात्मिक किड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा.
- पाऊस नसल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे. किंवा फुलअवस्थेत २ टक्के युरियाची फवारणी करावी.

- **भात पीक**
- रासायनिक खतांचा वापर : हळव्या जातींमध्ये उरलेले ५० टक्के नत्र लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे. निमगरव्या व गरव्या जातींमध्ये लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी ४० टक्के नत्र आणि २० टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. संकरित जातींकरिता हेक्टरी उरलेले २५ टक्के नत्र लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी आणि उर्वरीत २५ टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे.
- पाणी व्यवस्थापन : भात पिकाच्या योग्य वाढीकरीता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी. भात पोटरी अवस्थेत – ५ ते ३० सें.मी.

- **नाचणी पीक**
- पिकामध्ये नांग्या असल्यास १५ ते २० दिवसांनी नांग्या भरून घ्याव्यात.
- एक कोळपणी २० ते २५ दिवसांनी करावी. आंतरमशागत : एक कोळपणी व एक खुरपणी
- एक खुरपणी ४५ ते ६० दिवसांनी करावी.

- पेरणीनंतर ३० दिवसांनी ३० किलो नत्र द्यावे.

- **बाजरी**
- पिकाची दोन वेळा कोळपणी व गरजेनुसार १ ते २ वेळा खुरपणी करावी. पिकास ताण पडल्यास व पाणी उपलब्ध असल्यास पिकाच्या संवेदनक्षम अवस्थेत पाणी द्यावे.

- **सोयाबीन**
- तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपिकोनॅझोल २५% ईसी/ हेक्झाकोनॅझोल ५% ईसी १० मिली प्रती १० ली पाण्यातून फवारावे. करपा व पानांवरील ठिपके या रोगांच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसू लागताच कॉपर ऑक्झी क्लोराईड ५० डब्लू पी २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १० %+ सल्फर ६५ % ड्ब्लू जी २० ग्रॅम प्रती १० ली पाण्यातून फवारावे.

- **रब्बी ज्वारी**
- पहिला पंधरवाडा मुलस्थानी जलसंधारण करण्यासाठी ट्रॅक्टरचलित औजाराच्या सहाय्याने ३६ मीटर सारे पाडणे/बैलाच्या सहाय्याने १०१० मी. अंतरावर बांध घालावेत. जास्त उतार असल्यास ५५ मी.वर सारे पाडावे.

- **फळबाग व्यवस्थापन**
- **डाळिंब –** फळातील रस शोषणारे पतंग कीडा व कोलोट्रीटीकम या रोगांचे नियंत्रण करावे.
- **सिताफळ–** पिठया ढेकुण नियंत्रणासाठी जैवीक व निंबोळीयुक्त किडनाशकाचा वापर करावा. किडग्रस्त व रोगट फळे काढुन नष्ट करावीत.
- **बोर –** पाने खाणाऱ्या /केसाळ अळी भुंगेरे यांचे नियंत्रण करावे. मधमाशी संवर्धन करावे.
- **अंजीर –** अंजीर पिकावरील खोडकिड व सुत्रकृमीचे नियंत्रण करावे. खोडांना गेरू पेस्ट लावावी.
- **कागदी लिंबू –** पावसाचे जादा पाणी चराद्वारे बागेच्या बाहेर काढून द्यावे.
- **आंबे –** बहाराच्या फळांची काढणी करावी.
- **सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी :** डायमिथोएट २० मिली अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी.
- **कॅंकर / खैऱ्या रोग :** स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाणी.

- **भाजीपाला व्यवस्थापन**
- खरीप कांदा पिकाचे लागवडीसाठी रानबांधणी करावी.
- कांद्याची ७ ते ८ आठवड्याची रोपे लागवडीस वापरावी.
- लागवडीचे वेळेस कांदा रोपांची मुळे किडनाशक, बुरशीनाशक व जिवाणू खतांच्या द्रावणात बुडवावे.
- लागवडीचे वेळी खत मात्रेपैकी निम्मे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळेस द्यावी.
- खरीप मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, गवार, वेलवर्गीय भाजीपाला पिकांना खुरपणी करून नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत.
- सतत ढगाळ वातावरण असल्यास ७ ते ८ दिवसांच्या अंतराने बुरशीनाशकाची फवारणी करावी.

- पिकामध्ये पाणी साचू देऊ नये.
- रांगडा कांदा लागवडीसाठी बियाणाची पेरणी करावी.

- **आले**
- वेळच्या वेळी येणारी तणे खुरपणी करून काढून टाकावीत.
- उटाळणी करणे : आले पीक २.५ ते ३ महिन्याचे असताना उटाळणी करावी. यामध्ये लांब दांड्याच्या खुरप्याने माती हलवली जाते. त्यामुळे मुळ्या तुटून त्याठिकाणी नवीन तंतुमय मुळे फूटतात. आले पिकास ६ व्या ते ७ व्या महिन्यात फुले येतात त्यास हुरडे बांड असे म्हणतात. उटाळणी हूरडे बांड येण्यापूर्वी करावी. हुरडे बांड फुटल्यावर या पिकाच्या पानांची वाढ थांबून फण्याची वाढ होण्यास सुरूवात होते.
- उटाळणीनंतर पाण्याचा हलका ताण द्यावा म्हणजे फुटवे चांगले फुटतात.
- जमीन चुनखडयुक्त असेल तर पाने पिवळी पडलेली व शेंडा करपलेला दिसतो यावेळी मुळांना स्फुरद उपलब्ध होत नाही व त्यासाठी स्फुरद उपलब्ध करणारे जिवाणू खत एकरी २ किलो पाण्याद्यारे द्यावे.
- रिमझीम पावसात शाकीय वाढ चांगला जोर धरु लागते. अशावेळेस पिकास जास्त खाद्य अन्न लागते. त्याच्या वाढीचे बारकाईने निरीक्षण करुन नत्राचा दुसरा हप्ता ६० किलो नत्र द्यावे.
- हेक्टरी १.५ ते २.० टन करंजी किंवा निंबोळी पेंड द्यावी.
- कंदकूज रोगापासून आले पिकाचे संरक्षण करावे. आले पिकांवरील कंदकूज हा एक प्रमुख रोग आहे. वेळीच खबरदारी न घेतल्यास या रोगामुळे ५० टक्के पर्यत नुकसान होऊ शकते. भरपूर पाऊस, भारी काळी कसदार, कमी निचरा असणारी जमीन या रोगास पोषक ठरते. हा रोग ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीमध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो. प्रथम पानांच्या शेंडयावरून व कडांनी पिवळे पडून झाड खालीपर्यत वाळले जाते. खोडलगतचा जमिनीलगतचा भाग काळपट राखी पडतो. याच ठिकाणी माती बाजूस करून पाहिल्यास गड्डाही वरून काळा पडलेला व निस्तेज झालेला दसतो. या भागावर दाब दिल्यास त्यातून कुजलेले, घाण वास येणारे पाणी बाहेर येते. अशा झाडाचे खोड थोडे जरी ओढले तरी चटकन हातात येते. हा रोग प्रामुख्याने सुत्रकृमी किंवा खुरपणी करताना, आंतरमशागत करताना कंदास इजा झाल्यास त्यातून पिथीयम, फयजेरियम यासारख्या बुरशींचा गड्डयामध्ये शिरकाव होऊन कंद कुजण्यास सुरुवात होते.
- या रोगाच्या नियंत्रणासाठी लागवड करताना निरोगी बियाण्याचा वापर करावा. जमीन हलकी ते मध्यम परंतु उत्तम निच–याची निवडावी. पावसाळ्यात शेतामध्ये चर घेवून पाण्याचा निचरा करून यावा. तसेच मेटॅलॅक्सिल ८ टक्के + मून्कोझेब ६४ टक्के हे संयुक्त बुरशीनाशक २.५ ग्रॅम प्रति लिटर किंवा कार्बेन्डॉझिम (५० डब्ल्यु.पी.) १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात किंवा मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर यापैकी एका बुरशीनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. लागवडीच्या वेळी ट्रायकोडर्मा प्लस ५ किलो प्रति हेक्टरी शेणखतातून मिसळून घ्यावा.

- **पशुसंवर्धन**
- गोठयातील जमीन कोरडी राहण्यासाठी चुन्याचा प्रयोग करावा. ज्वारी किंवा गव्हाचा तुसात चुना मिसळवुन त्याचा पातळ थर अंथरल्याने गोठयातील आर्द्रता कमी होतेव गोठे स्वच्छ व कोरडे राहण्यात मदत होते.
- जनावरांचे खुर वाढले असतील तर ते कापून घ्यावेत.
- गोठयात पावसाचे पाणी जमा होवून चिखल होणार नाही याची दक्षता घ्यावी.

- अवजारे
- फुले मोल नांगर
- क्षारपड व पाणथळ जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा आणि क्षारांचा निचरा करण्यासाठी कमी खर्चात मोल निचरा पध्दती राबविण्यासाठी.
- मोल नांगराने मोल निचरा करण्यासाठी हेक्टरी रु. १५०० खर्च येतो.
- मोल नांगर ६० ते ७२ एच.पी. ट्रॅक्टरद्वारे ओढता येतो.
- या यंत्राद्वारे दोन मोलमध्ये ४ मिटर अंतर ठेवल्यास प्रति तासाला ०.३ हेक्टर क्षेत्र करता येते.

**प्रकाशक** : डॉ. शरद गडाख
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
श्री. सुनिल राजमाने
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४८१/२०२२